MHKO090001382011.

<u>रे.क.नं.कं. ६४/२०११ नि. ६८ च्या अर्जावर आदेश.</u>

१ सदरचा अर्ज अबेटमेंटचा आदेश रद्द करणेसाठी दाखल केला आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, सदर कामी वादी क्र.२१ सिताबाई रामा कसेकर हे दिनांक ४.३.२०१९ रोजी मयत झाले आहेत. मयत झाले पासून ९० दिवसात वारस रेकॉर्डवर आणणे गरजेचे होते. वारी क्र. २१ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी १ महिने १४ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी यांना वादी क्र.२१ चा मयत दाखला वेळेत उपलब्ध न झालेने तसेच वादी हे आजारी असल्याने प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळावा म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीनी दिलेली कारणे योग्य नसून वादीनी विनाकारण विलंब लावलेला आहे सबब अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. मयताचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणावनुगुणावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. अर्जाच्या निर्णयाच्या कामी वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरीत्या संपूष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज वादीवर रक्कम रू. २००/— खर्च बसवून मंजूर करीत आहे.

५. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

<u>आदेश</u>

सदरचा अर्ज वादी यांना रक्कम रू.२००/—
कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

Digitally signed by Yamini Dilip Boravke
Date: 2019.10.16 12:52:17 +0530

दिनांकः— १६/१०/२०१९.

( यामीनी बोरावके )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P. D.F file judgment/Order are same, word to word, as per the original judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K. B. Chavan |
| Name of the Court | Civil Court, Senior Division. Gadhinglaj |
| Date of Dictation | 16-10-2019. |
| Judgment/Order signed by the P.O on | 16-10-2019. |
| Judgment/Order uploaded on | 16-10-2019. |